


सत्यमेव जयते

**अण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (आर्टी), मुंबई**

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)

बी-२०१/२०२ अर्जुन सेटंर, स्टेशन रोड, गोवंडी (पु) मुंबई- ४०० ०८८

समता न्याय एकात्मता

रजि नं.४३७६०३ Email Id- esta.arti@gmail.com website https://arti.org.in फोन नं. ०२२ - ४४५१५८५४/२५५००१९४/२५५००१९५


जा.क्र./आर्टी/मुंबई/योजना/जेईई/नीट/२०२५-२६/०१४९ दिनांक – १०/०९/२०२५

# सूचना

अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (आर्टी), मुंबई मार्फत महाराष्ट्र राज्यातील मातंग व त्यातील तत्सम जातींतील उमेदवारांना आर्टी मार्फत JEE/NEET परीक्षेचे पूर्व प्रशिक्षण देण्यात येत आहे. त्याअनुषंगाने मुंबई, पुणे, नाशिक, छ. संभाजीनगर, लातूर, अमरावती व नागपूर या ठिकाणी JEE प्रशिक्षणासाठी १५० विद्यार्थी व NEET प्रशिक्षणासाठी १५० विद्यार्थी यांची निवड करण्याकरिता आर्टी मार्फत दि. २५/०६/२०२५ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली. सदर जाहिरातीद्वारे दिनांक २०/०८/२०२५ पर्यंत ऑनलाईन अर्ज / नोंदणी करण्याबाबत नमूद करण्यात आले होते. त्याअनुषंगाने विद्यार्थ्यांच्या प्राप्त ऑनलाईन माहितीच्या आधारे आर्टी मार्फत JEE व NEET करिता तात्पुरती निवड यादी व प्रतीक्षा यादी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

सदर निवड व प्रतिक्षा यादी ही तात्पुरत्या स्वरुपाची असून विद्यार्थ्यांच्या मूळ कागदपत्राच्या तपासणीनंतर निवड यादी अंतिम करण्यात येईल. प्रसिद्ध करण्यात आलेल्या तात्पुरत्या निवड यादीतील **मुंबई, पुणे, नाशिक, छ. संभाजीनगर, लातूर, अमरावती व नागपूर** या ठिकाणी निवड झालेल्या JEE प्रशिक्षणासाठी **पात्र** १५० विद्यार्थी व NEET प्रशिक्षणासाठी **पात्र** १५० विद्यार्थ्यांनी मूळ कागदपत्रांची तपासणी **बार्टी येरवडा संकुल, ४, कॉमरझोन आयटी पार्क, अंतर्गत रोड, जेल रोड, येरवडा, पुणे, महाराष्ट्र ४११००६ येथे दि. १५/०९/२०२५ ते १७/०९/२०२५ रोजी सकाळी १०.३० पासून** करण्यात येणार आहे. तपशील खालीलप्रमाणे

**विद्यार्थ्यांनी खालीलप्रमाणे नमूद मूळ कागदपत्रासह उपस्थित राहावे.**

१. १० वी उत्तीर्ण गुणपत्रिका.
२. रहिवासी दाखला.
३. उत्पन्नाचा दाखला.
४. जात प्रमाणपत्र.
५. ११ वी विज्ञान शाखेत प्रवेश असल्याचे बोनाफाईड
६. स्वाधार योजनेचा लाभ न घेतल्याचे प्रतिज्ञापत्र

**टीप :-**

१. ऑनलाईन अर्ज सादर करताना विद्यार्थ्यांनी JEE व NEET अशा दोन्ही प्रशिक्षणाकरिता अर्ज केलेले आहे. अशा विद्यार्थ्यांची निवड झाल्यास विद्यार्थ्यांनी कागदपत्रे तपासणी दरम्यान कोणत्याही एका प्रशिक्षणाची (JEE किंवा NEET) निवड करणे आवश्यक आहे.

२. ऑनलाईन अर्ज सादर करताना एकाच विद्यार्थ्याने वेगवेगळया ठिकाणी अर्ज सादर केले आहेत अशा विद्यार्थ्यांची निवड झाल्यास विद्यार्थ्यांनी कागदपत्रे तपासणी दरम्यान कोणत्याही एका ठिकाणाची प्रशिक्षणासाठी निवड करणे आवश्यक आहे.

स्वाक्षरी

(सुनील वारे)

**व्यवस्थापकीय संचालक**

**अण्णा भाऊ साठे संशोधन व**

**प्रशिक्षण संस्था (आर्टी), मुंबई**

# प्रतिज्ञापत्र

मी -----------------------------------------------------------------रा. -------------------------------------------इयत्ता--------मध्ये शिक्षण घेत आहे. माझी आर्टी मार्फत JEE/NEET चे प्रशिक्षणाकरीता-------------------येथे निवड झालेली असून मी ---------------------------------------------------------या संस्थेत JEE/NEET प्रशिक्षण घेत आहे. तरी मी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ घेतलेला आहे/नाही.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ घेतला असल्याचे आढळून आल्यास मी नियमानुसार कार्यवाहीस पात्र राहील करीता प्रतिज्ञापत्र लिहून देत आहे.

नाव---------------------------------

स्वाक्षरी------------------------------

ठिकाणः

दिनांक: